NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA 2.62)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

केगाव, सोलापूर - ४१३ २५५. महाराष्ट्र (भारत)

दूरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७१ / ७२/ ७३ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,

संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल : registrar@sus.ac.in



## संशोधन/पीएच. डी. विभाग

जा.क्र.पुअहोसोविसो/ पीएच.डी/२०२०/3900 दिनांक: 24 JUN 2020

### परिपत्रक

**वाचा:- विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचना क्रं.-१३ (UGC Guidelines on Examination and Academic Calendar for the University in View of COVID-19 Pandemic and Subsequent Lockdown Sr.No.13)**

विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/शैक्षणिक संकुले/मान्यताप्राप्त संशोधन केंद्र यांना आदेशान्वये कळविण्यात येते की, कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावामुळे दि.२५/०३/२०२० पासून संपूर्ण देशामध्ये लॉकडाऊन करण्यात आला होता हे आपणास विदितच आहे. त्यामुळे विद्यापीठाचेही सर्व कामकाज पूर्ण क्षमतेने सुरु नव्हते. दरम्यानच्या काळात विद्यापीठ अनुदान आयोगाने सर्व विद्यापीठांना काही मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये सूचना क्र.१३ नुसार - "The M.Phil. or Ph.D. students, whose maximum period for submission of M.Phil./Ph.D. Dissertation/Thesis prescribed under relevant rules/regulation/ordinances of the concerned universities is expired/expiring during the Corona pandemic period, may be allowed to submit their Dissertation/Thesis, including completion of pending formalities, within six month from the date of expiry of regular prescribed period. The extension of six month may also be considered for those students who are yet to submit their Dissertation/Thesis."

सबब, विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयात/शैक्षणिक संकुलात/मान्यता प्राप्त संशोधन केंद्रामध्ये एम.फील. व पीएच.डी. आभ्यासक्रमास प्रवेशीत संशोधन विद्यार्थ्याचे संशोधन प्रबंध विद्यापीठास सादर करण्याची मुदत कोविड-१९ या विषाणूच्या प्रादुर्भावाच्या काळात म्हणजेच दि.२५/०३/२०२० ते दि.३०/०६/२०२० पर्यंत संपणार होती अशा विद्यार्थाकरिता त्यांचे संशोधन प्रबंध विद्यापीठास सादर करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी संशोधन व मान्यता समितीच्यावतीने ०६ महिन्यापर्यंत मुदतवाढ दिलेली आहे.

संबधीत विद्यार्थ्यांनी आपल्या एम.फील. व पीएच.डी. चा संशोधन प्रबंध सादर करण्यासाठी नियमानुसार विहित प्रकीया पूर्ण करावयाची आहे, ती प्रक्रिया पुर्ण करून आपले संशोधन प्रबंध विद्यापीठास सादर करावेत.

दि.१ जानेवारी २०२० ते ३० जून २०२० पर्यंतचे संशोधन प्रगती अहवाल जमा करण्याची मुदत दि.३०/०६/२०२० पर्यंत होती अशा विद्यार्थ्यांना फक्त या कालावधी पुरता कोणताही दंड न घेता त्यांचे प्रगती अहवाल आणि ज्या विद्यार्थ्यांचे शुल्क भरण्याची व मुदतवाढीकरीता अर्ज सादर करण्याची मुदत या दरम्यान संपत होती अशा विद्यार्थ्यांचे शुल्क व मुदतवाढीचे अर्ज स्विकारण्यात येतील.

सदरची बाब विद्यापीठाशी संलग्नित संशोधन केंद्राचे व महाविद्यालयाचे प्राचार्य/शैक्षणिक संकुलाचे संचालक यांनी सर्व एम.फिल व पीएच.डी च्या अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्याच्या निदर्शनास आणून दयावी ही विनंती.

कळावे.

(डॉ. शि. ना. शिंदे)
सहायक कुलसचिव

प्रत:

१. मा.कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा.प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
३. मा.कुलसचिव महोदयांचे कार्यालय, प्रस्तुत विद्यापीठ.
४. मा.प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व मान्यता प्राप्त संशोधन केंद्र व महाविद्यालये.
५. मा. संचालक/विभागाप्रमुख. मान्यता प्राप्त संस्था/ विद्यापीठ परिसरातील सर्व शै.संकुले.